
आजचा सुविचार
काळा रंग हा अशुभ समजला जातो.
पण प्रत्येक काळा रंगाचा
फळा हा अनेक विद्यार्थ्यांचे
आयुष्य उजलवत असतो...

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २४४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.१६ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## नगरसेविका सहर शेख यांच्या पदावर गंडांतर



अक्षराज : विनोद वास्कर

**दि.१५, मुंब्रा (ठाणे) :** स्थलांतरित असतानाही 'नमुना-८' वापरून अधिकाऱ्यांची दिशाभूल करत बनावट जात प्रमाणपत्र मिळवल्याचा ठपका एमआयएम नगरसेविका सहर शेख यांचे वडील युनूस इकबाल शेख यांच्यावर ठेवण्यात आला आहे. त्याच आधारे सहर शेख यांनी जात प्रमाणपत्र मिळवून ठाणे महापालिका निवडणूक लढवली. आता या प्रकरणी चौकशी सुरू झाल्याने सहर शेख यांच्या नगरसेवक पदावर गंडांतर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**प्रकरण काय आहे?**

उत्तर प्रदेशातील गाझियाबादचे मूळ रहिवासी असले युनूस इकबाल शेख महाराष्ट्रात स्थलांतरित झाले. तक्रारदार सिद्धीकी फरहा सबाब अहमद यांनी ठाणे उपविभागीय अधिकारी कार्यालयात दिलेल्या तक्रारीनुसार, स्थलांतरितांना 'नमुना-१०' लागू असताना युनूस यांनी 'नमुना-८' वापरून अधिकाऱ्यांची दिशाभूल केली व महाराष्ट्रातील 'इतर मागास प्रवर्गाचा' बनावट जात दाखला मिळविला.

त्यानंतर त्यांची मुलगी सहर शेखने त्याच आधारे मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयातून जात प्रमाणपत्र घेतले व ठाणे महापालिका निवडणुकीत एमआयएम पक्षातून मुंब्यातील प्रभाग ३० मधून विजय मिळवला. 'कैसे हराया?' या विधानामुळे त्या त्यावेळी चर्चेत आल्या होत्या.

**तहसीलदारांच्या सुनावणीत उघड झाल्या त्रुटी**

तक्रारीच्या अनुषंगाने ठाणे तहसीलदारांनी १८ मार्च व २३ मार्च रोजी सुनावणी घेतली. सुनावणीदरम्यान युनूस शेख यांच्या जात दाखल्यामधील खालील गंभीर त्रुटी समोर आल्या.

**नेमके आक्षेप काय?**

१) दाखल्याच्या छायाप्रतीवर शीर्षकात 'महाराष्ट्र शासन' असा उल्लेख नाही.
२) दाखल्यावर उपविभागीय अधिकाऱ्यांची स्वाक्षरी नाही.
३) युनूस यांच्या लिव्हिंग सर्टिफिकेटवरील वडिलांच्या नावात बदल आहे.
४) युनूस यांच्या काकांचा जात दाखला गाझियाबादचा आहे.
५) स्थलांतरित अधिनियम २००० चे कलम ६ मधील 'नमुना-१०' चा अभाव आहे.
६) ठाण्याच्या रहिवासी असतानाही सहर शेखने मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयातून दाखला का घेतला, यावर तहसीलदारांनी शंका उपस्थित केली.

## मुंबईत १ मे पासून रिक्षा - टॅक्सी चालकांना मराठी भाषा सक्तीची

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.१५, मुंबई :**

महाराष्ट्राची राजधानी असणाऱ्या मुंबईमध्ये आता रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य म्हणजे सक्तीची असणार आहे. मुंबई शहर हे महाराष्ट्राचे महत्त्वाचे शहर आहे. इथे रोजगाराच्या निमित्ताने देशाच्या विविध भागातून नागरीक आले आहेत. तसेच महाराष्ट्राचा भूमिपुत्र असणारे मुंबईकर हे देखील मुंबईत वास्तव्यास आहेत. मराठी ही महाराष्ट्राची राज्य भाषा आहे. त्यामुळे मुंबईत राहणाऱ्यांना मराठी भाषा बोलता येणं हे सर्वांसाठी सोयिस्कर आहे. असं असलं तरी अनेकजण मराठी भाषेला कमी लेखण्यासाठी मराठी समजत असूनही मराठी समजत नाही किंवा मराठी बोलणार नाही, असं उद्धटपणे बोलतात. यामध्ये काही रिक्षाचालक आणि टॅक्सीचालकांचादेखील समावेश आहे. विशेष म्हणजे याआधी मराठी भाषा बोलणार नाही, असं ठासून सांगणाऱ्या एका रिक्षाचालकाचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. पण आता अशाप्रकारचं कृत्य करणाऱ्या रिक्षा आणि टॅक्सी चालकांना घरी बसावं लागणार आहे. कारण त्यांचा परवानाच रद्द होणार आहे. मुंबईत रिक्षा आणि टॅक्सी चालवायची असेल तर मराठीचं ज्ञान असणं बंधनकारक



असणार आहे. येत्या १ मे महाराष्ट्र दिनापासून याबाबतची कठोर कारवाई करण्यास सुरुवात होणार आहे.

येत्या १ मे, महाराष्ट्र दिनापासून परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे अनिवार्य करण्यात येणार आहे. याबाबत मोटार परिवहन विभागाच्या ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांमार्फत परवाना तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून संबंधित चालकांना मराठी लिहिता व वाचता येते का, याची पडताळणी केली जाणार आहे. मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील, असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे.

मंत्री सरनाईक म्हणाले की, मोटार परिवहन विभागामार्फत रिक्षा किंवा टॅक्सी चालकांना परवाना देताना स्थानिक भाषेचे, म्हणजेच मराठी भाषेचे ज्ञान असणे हा नियम आधीपासूनच लागू आहे. मात्र, मुंबई महानगर क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये अनेक परवानाधारक चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधता येत नाही, तसेच काही चालक मराठी बोलण्यास टाळाटाळ करतात, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्या आहेत.

मंत्री सरनाईक म्हणाले की, मोटार परिवहन विभागामार्फत रिक्षा किंवा टॅक्सी चालकांना परवाना देताना स्थानिक भाषेचे, म्हणजेच मराठी भाषेचे ज्ञान असणे हा नियम आधीपासूनच लागू आहे. मात्र, मुंबई महानगर क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये अनेक परवानाधारक चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधता येत नाही, तसेच काही चालक मराठी बोलण्यास टाळाटाळ करतात, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्या आहेत.

ते पुढे म्हणाले की, ज्या प्रदेशात आपण राहतो त्या प्रदेशाची भाषा व्यवसायासाठी शिकणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपल्या मातृभाषेचा अभिमान असणे जितके आवश्यक आहे, तितकेच इतर राज्यात व्यवसाय करताना त्या राज्याच्या भाषेचा आदर करणेही महत्त्वाचे आहे.

दरम्यान, म्हणूनच १ मेपासून सर्व परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा लिहिता व वाचता येणे बंधनकारक राहील. नियमांचे पालन न करणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील. तसेच नियमांकडे दुर्लक्ष करून चुकीच्या पद्धतीने परवाने देणाऱ्या परिवहन अधिकाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

## संशोधन, जिज्ञासा आणि निरंतर शिकण्याची वृत्ती आत्मसात करा - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू



- **वैद्यकीय क्षेत्रात नैतिक मूल्यांचे अधिष्ठान जपण्याचेही आवाहन**
- **'एम्स'चा द्वितीय दीक्षांत समारंभ उत्साहात**
- **राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती**

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** वैद्यकीय क्षेत्रात सेवाभावा बरोबरच आयुष्यभर शिकत राहण्याची वृत्ती जपायला हवी. वैद्यकीय क्षेत्रात नैतिक मूल्यांचे स्थान सर्वतोपरी आहे. जिज्ञासा, संशोधन आणि सतत शिकत राहण्याची वृत्ती आत्मसात करा. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी ते करुणा, प्रामाणिकपणा आणि रुग्णकेंद्रित दृष्टिकोनाची जागा घेऊ शकत नाही. वैद्यकीय क्षेत्रात यशासह करुणेचा भाव जपल्यास तुम्ही एक उत्तम व्यक्तीही होऊ शकाल, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज येथे केले.

केंद्रीय आयुर्विज्ञान संस्थेचा (एम्स) द्वितीय दीक्षांत समारंभ आज संस्थेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपले हे विचार मांडले. या समारंभात राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव, नागपूर एम्सचे अध्यक्ष डॉ. अनंत पांढरे, कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी व्यासपीठावर उपस्थित होते.

उपस्थित वैद्यकीय विद्यार्थ्यांना संबोधित करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू पुढे म्हणाल्या की, वैद्यकीय क्षेत्र हा केवळ एक व्यवसाय नसून संवेदनशीलतेने मानवतेची सेवा करण्याचा एक मार्गही आहे. एक वैद्यकीय चिकित्सक केवळ आजारांवर उपचार करत नाही, तर तो आजाराने ग्रासलेल्या व्यक्तीच्या मनात आशेचा संचारही निर्माण करतो.

चिकित्सकाचा सहानुभूतीचा सल्ला केवळ आजारी व्यक्तीलाच नव्हे तर त्याच्या कुटुंबीयांनाही आधार देतो. अनेकदा डॉक्टरांसमोर कठीण परिस्थिती निर्माण होते. मात्र, अशा परिस्थितीतही रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदनशील राहणे आवश्यक आहे. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी देखील आरोग्य कर्मचाऱ्यांशी नेहमी सन्मानाने वागायला हवे. डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील विश्वास टिकवून ठेवण्यासाठी हे गरजेचे आहे, असा मोलाचा सल्लाही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यावेळी दिला.

आरोग्य सेवा क्षेत्र सातत्याने बदलत आहे. जगभरात नवनवीन तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल आरोग्य सेवा आणि प्रगत संशोधनाच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती होत आहे. आपण हे बदल आत्मसात करून पुढे वाटचाल केली पाहिजे. तंत्रज्ञान विकासाचा उपयोग ग्रामीण आणि शहरी भागांतील आरोग्य सुविधांची दरी कमी करण्यासाठी आणि सर्वांना दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी केला पाहिजे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

गेल्या दशकभरात केंद्र सरकारने आरोग्य सेवांच्या क्षेत्रात अनेक महत्वाची पावले टाकली आहेत. 'आयुष्मान भारत योजना, 'आयुष्मान आरोग्य मंदिरा'ची स्थापना, डिजिटल हेल्थ मिशन, लसीकरण कार्यक्रमांचा विस्तार, गंभीर आजारांच्या नियंत्रणासाठी राष्ट्रीय टीबी निर्मूलन कार्यक्रम, राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग आणि राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम राबवले जात आहेत. लोकांना स्वस्त आणि दर्जेदार औषधे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'अमृत'फार्मसी आणि जन औषधी केंद्र उघडण्यात आली आहेत, असा उल्लेखही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या भाषणात केला.

**एम्स आणि आरोग्य विद्यापीठात व्यापक सहकार्य हवे– राज्यपाल जिष्णू देव वर्मा**

मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि कर्करोगासारख्या जीवनशैलीशी निगडित आजारांमध्ये सध्या मोठी वाढ होत आहे. नैराश्य, चिंता आणि व्यसनाधीनतेसारख्या मानसिक आजारांच्या समस्यांकडेही गांभीर्याने लक्ष पुरविण्याची गरज निर्माण झाली असून आयुष्यमान भारत सारख्या योजनांमुळे लोक दर्जेदार आरोग्य सेवांचा लाभ घेण्यासाठी शासकीय रुग्णालयांकडे वळत आहेत, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी यावेळी बोलताना केले.

राज्यपाल वर्मा म्हणाले, आरोग्य क्षेत्रात दर्जेदार पायाभूत सुविधा आणि सेवा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक, नागरी आणि धर्मदाय आरोग्य संस्थांचे बळकटीकरण करण्याची गरज निर्माण झाली आहे. केंद्रीय आयुर्विज्ञान संस्था, नागपूर आणि महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ या संस्थांमध्येही व्यापक सहकार्य होण्याची गरज आहे. त्यातून संसोधन, अनुभव व कौशल्यांची देवाणघेवाण तसेच एकूणच आरोग्यसेवा व्यवस्थेच्या बळकटीकरणाला चालना मिळू शकेल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

**पाच किमीच्या परिघात...**

**वैद्यकीय सुविधा उपलब्ध करणार**
**– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी बोलताना म्हणाले की, महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात १५ हून अधिक वैद्यकीय महाविद्यालयांची निर्मिती करण्यात आली आहे. आरोग्य सुविधा शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न आहे. संसर्गजन्य आजारांवर मात करण्यासाठी व्यापक नियोजनाची आवश्यकता आहे. पाच किलोमीटरच्या परिघात सर्व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे अद्ययावतीकरण करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

जगाला आज वैद्यकीय सेवेची गरज आहे. या संस्थेतून उत्तीर्ण होऊन भविष्याकडे वाटचाल करणाऱ्या विद्यार्थ्यांनी उपचाराबरोबरच करुणेचा भावही जपणे आवश्यक आहे. ज्ञान आणि करुणेचा संगम झाल्यास जीवनात यशस्वी व्हाल, असे आवाहनही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले.

**देशाची आरोग्यसेवा सशक्त करण्याची जबाबदारी तुमच्यावर – प्रतापराव जाधव**

आधुनिक काळात जगभरातील लोक तणावमुक्त तसेच आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा अंगिकार करण्याचे साधन म्हणून आयुष पद्धतींचा अवलंब करीत आहेत. ही पद्धती आधुनिक चिकित्सा पद्धतीसह एकीकृत करण्याच्या दिशेने आम्ही कार्य करीत आहोत. सर्व आयुर्विज्ञान संस्थांमध्ये आयुष विभागही स्थापन करण्यात आले असल्याचे केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले. महाराष्ट्रातही येथील कुशल नेतृत्वाच्या मार्गदर्शनात गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा पुरविण्याच्या दिशेने अत्यंत उल्लेखनीय कार्य होत आहे. आजच्या दीक्षांत समारंभाच्या माध्यमातून विद्यार्थी केवळ पदवीच प्राप्त करीत नाहीत, तर एक महत्त्वाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर येत आहे. देशाची आरोग्य सेवा सशक्त करण्याची जबाबदारीही या विद्यार्थ्यांच्या खांद्यावर आहे, याकडे केंद्रीय मंत्री श्री. जाधव यांनी उपस्थित विद्यार्थ्यांचे लक्ष वेधले.

**२१० विद्यार्थ्यांना पदवीप्रदान**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरूपात विविध कोर्समध्ये अव्वल आलेल्या आठ विद्यार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात पदवीप्रदान करण्यात आली. त्यानंतर दीक्षांत समारंभात एकूण २१० विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कामगिरीच्या गौरवार्थ पदव्या व सुवर्णपदके प्रदान करण्यात आली. यामध्ये १२९ एमबीबीएस, २९ एमडी/एमएस, ३५ बी.एस्सी. (ऑनर्स) नर्सिंग, ५ एम.एस्सी. आणि १२ संलग्न व आरोग्यसेवा शाखांतील पदवीधरांचा समावेश आहे.




## विनोदाचा बादशहा

जगातला सर्वात लोकप्रिय अभिनेता, विनोदाचा बादशहा चार्ली चॅप्लिन याची जयंती आहे. पहिल्या महायुद्धाच्या अगोदाच्या काळात मुकपटात अभिनय करून आपल्या आगळ्या वेगळ्या शैलीने प्रेक्षकांना मनमुराद हसावणाऱ्या चार्ली चॅप्लिन यांचा जन्म १६ एप्रिल १८८९ रोजी लंडन येथे झाला. चार्ली चॅप्लिन यांनी आपल्या अभिनयाची सुरवात शालेय जीवनापासूनच केली. वयाच्या नवव्या वर्षी शाळेतल्या नृत्यपथकात त्यांची निवड झाली. या नृत्यपथकाद्वारे सादर होणाऱ्या कार्यक्रमात ते अभिनय आणि नृत्य करत. त्यांची आई मानसिक आजाराने त्रस्त असल्याने वयाच्या तेराव्या वर्षीच त्यांना शाळा सोडावी लागली. अर्थाजनासाठी ते लहान मोठे कामे करू लागले. घरची परिस्थिती हलाखीची असूनही त्यांनी आत्मविश्वास कमी होऊ दिला नाही. परिस्थितीने उलट त्यांना खंबीर बनवले. त्यावेळेच्या परिस्थितीबद्दल चार्ली चॅप्लिन आपल्या आत्मचरित्रात म्हणतात मला त्या परिस्थितीचे चटके फार काळ सहन करावे लागले नाही कारण आम्ही त्या परिस्थितीतून सतत वाटचाल करत होतो आणि लहान असल्यामुळे हा त्रास मी सहज विसरून जायचो. त्यांचा आत्म विश्वास कणखर होता छोटीमोठी कामे करूनही ते कधीही आपल्या ध्येयापासून ढळले नाहीत. मोठा अभिनेता होण्याचे ध्येय पूर्ण करण्यासाठी ते नाटक कंपन्यांना नित्यनियमाने संपर्क साधत. त्यांच्या मेहनतीला फळ मिळाले त्यांना अनेक नाटकात भूमिका मिळू लागल्या. पुढे मोठया पडद्यावर देखील त्यांना संधी मिळत गेली.

पडद्यावरील त्यांचे मस्तमौला आगळेवेगळे रूप प्रेक्षकांना खूप भावले. पडद्यावर त्यांची इन्ट्री झाली की प्रेक्षक खळखळून हसत. एक टाईट कोट, छोटी हॅट, मोठे शूज आणि चेहऱ्यावरील छोटीशी मिशी असं त्यांचं पडद्यावरील वेडगळ रूप प्रेक्षकांना खूप भावले. हे वेडगळ रूप प्रेक्षकांना इतकं आवडलं की पुढं हेच त्यांचं वेडगळ रूप त्यांची ओळख बनली. या व्यक्तिरेखेबद्दल ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात ज्या क्षणी मी तो पोशाख केला, मेकअप केला, त्याच क्षणी मी ती व्यक्तिरेखा अनुभवू लागलो. मी त्याला ओळ्खयचो आणि रंगमंचावर असेपर्यंत तो माझ्यात भिनलेला असायचा. चार्ली चॅप्लिन यांनी आयुष्याचं सार पडद्यावर अनेक तऱ्हेने जगपुढे मांडले. खिल्ली उडवण्यासाठी दुःख हे कारण असतं. खिल्ली उडवणे म्हणजे प्रतिकार करणे निसर्गाच्या शक्तीपूढे स्वतःच्या हतबलतेतही आपण हसत राहिले पाहिजे. प्रतिकुलतेचा हसत हसत सामना केला पाहिजे, नाहीतर मानसिकरीत्या खचून जाल असे ते म्हणत म्हणूनच त्यांच्या आयुष्याच्या जवळचा चित्रपट 'द कीड' याचं ओपनिंग टायटल होतं अ पिक्चर विथ अ स्माईल अँड परहॅप्स अ टियर. स्वतःच दुःख विसरून आईचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी पडद्यावर वेडगळ भूमिका करुन जगभरातील प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. भाषेच्या बंधनाविना पडद्यावरून तो कुठल्याही प्रेक्षकांशी संवाद साधू शकला त्यासाठी त्यांनी वापरलेले साधन म्हणजे भरपूर हासू आणि थोडेसे आसू. चार्ली चॅप्लिन यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रेक्षकांना गडबडा लोळायला लावून हसवत आणि दुसऱ्याच क्षणी डोळ्यात पाणी आणून रडवत.

आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी अनेक युक्त्या करून त्या पडद्यावर साकारल्या आणि गाजवल्या. जागतिक पटलावर महानायक म्हणून ते आयुष्यभर वावरले. पहिल्या महायुद्धाच्या काळातही त्यांनी लोकांना हसवण्याचे कार्य केले. २५ वर्षानंतर जागतिक मंदी आणि हिटलरच्या काळातही त्यांनी प्रेक्षकांना हसवण्याचे कार्य थांबवले नाही. लोकांना ज्याकाळात मनोरंजनाची आणि हास्याची अधिक गरज होती त्याकाळात चार्ली चॅप्लिन यांनी लोकांसाठी उत्तम भूमिका बजावल्या. २५ डिसेंबर १९७७ रोजी प्रेक्षकांना खळखळून हसवणारा हा महान अभिनेता पप्रेक्षकांना दुःख सागरात लोटून काळाच्या पडद्याआड गेला. चार्ली चॅप्लिन यांना जयंतीदिनी भावपूर्ण आदरांजली.

**– श्याम ठाणेदार**

# भीमा, तुझ्या मताचे लोक!

लोकशाहीर वामनदादा कर्डक यांनी बहुजन समाजाला साद घालताना लिहिले होते...

**भीमा, तुझ्या मताचे जर पाच लोक असते,**
**तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते.**
**वाणीत भीम आहे, करणीत भीम असता,**
**वर्तन तुझ्या पिलांचे सारेच चोख असते...**


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची जहालता जपण्याचे सामर्थ्य असणारा समाज तयार होऊ शकला नाही, हे वास्तव आहे. आज खोट्या घोषणा, दिखावेबाज समाजकार्य आणि छुप्या रणनीतीने चालणारे नेते व कार्यकर्ते वाढले आहेत. त्यांच्या वाणीत आणि करणीत अंतर वाढल्याचे दिसून येते. डॉ. आंबेडकरांवर शब्दसुमने उधळणाऱ्या आणि भीम विचारांनी सभा गाजवणाऱ्यांनी कृतीत 'भीम' आणण्याचे शिवधनुष्य उचलले पाहिजे.

बोलणे सोपे आणि करणे अवघड हे खोटे ठरवणे म्हणजेच भिमाच्या मताचे होणे होय. पूर्वी चळवळींतून, संघर्षातून आणि समाजसुधारक कार्यातून नेते आणि कार्यकर्ते घडत होते; आता मात्र गगनभेदी डरकाळ्या फोडणारे, समाजमाध्यमांवर चमकणारे आणि केवळ दिखाव्यापुरते समाजकार्य करणारे लोक वाढले आहेत.

डॉ. आंबेडकरांच्या विचारांच्या विरोधातल्या विचारसरणीशी जोडून घेणारे , लाचार व सौदेबाज वृत्तीचे, तसेच स्वतःच्या कुकृत्यांवर पांघरूण घालून त्यांच्या नावाचा वापर करणारे लोक 'भीमाच्या मताचे' कदापि असू शकत नाहीत.

भिमाच्या मताचे अनुयायी होण्यासाठी पहिली अट म्हणजे शिक्षण. कारण डॉ. आंबेडकर म्हणतातज्याला दुःखातून सुटका हवी आहे, त्याने लढले पाहिजे; आणि ज्याला लढायचे आहे, त्याने आधी शिकले पाहिजे. ज्ञानाशिवाय लढा दिला, तर पराभव अटळ आहे. त्यामुळे केवळ समाजात शिक्षणाचे महत्त्व सांगणे पुरेसे नाही; प्रथम स्वतः शिक्षित झाले पाहिजे. काही कारणास्तव शिक्षण अर्धवट राहिले असेल, तर ते मुक्त विद्यापीठांद्वारे पूर्ण केले पाहिजे. तसेच, आपल्या मुला-मुलींना शिक्षण देण्याचा निर्धार केला पाहिजे. डॉ. आंबेडकर म्हणायचेआई-वडील मुलाला निव्वळ जन्म देतात आणि कर्म देत नाहीत,हा दैववादी सिद्धांत आपण झटकला पाहिजे.मुलांचे भवितव्य आई-वडिलांच्या हातात असते हे तत्त्व मनात बिंबले पाहिजे आणि मुलांबरोबर मुलींचेहे शिक्षण करण्यात आपण पुढे आले पाहिजे. तरच आपला विकास वेगाने होईल. थोडक्यात, 'भीमाच्या मताचे' होण्यासाठी स्वाभिमान, स्वावलंबन आणि आत्मोद्धाराची चळवळ उभी करणे आवश्यक आहे.

स्वाभिमान गहाण न ठेवता जगणे, म्हणजेच भीमाच्या मताचे होणे. थोड्याशा राजकीय, आर्थिक किंवा इतर फायद्यासाठी




आंबेडकरी विचारांशी विसंगत असलेल्या विचारधारेशी जुळवून घेणे म्हणजे स्वतःसह समाजाचीही दिशाभूल करणे होय. ज्या दिवशी स्वहित, समाजहित आणि देशहित यांपैकी निवड करण्याची वेळ येईल, त्या वेळी प्रथम देश, नंतर समाज आणि शेवटी स्वहित पाहिले पाहिजे.

वामनदादा पुढे म्हणतात

गोळी खुशाल घाला, फाशी खुशाल द्या रे,
खोटे इथे खऱ्याचे दुसरेच टोक असते.
तत्त्वाची जाण असती, बिनडोक लोक नसते;
सारे चलन तयांचे ते रोखठोक असते...

स्वतःचे नाणे खणखणीत होण्यासाठी या ओळी पुरेशा आहेत. खोटं नाणं समाजात फार काळ चालत नाही. खोट्या गोष्टींचा डोलारा एक ना एक दिवस कोसळल्याशिवाय राहत नाही. समाजाच्या डोळ्यात धूळफेक करण्याचे उद्योग थांबवले पाहिजेत. स्वतःचे चारित्र्य जपले पाहिजे. व्यसनाधीनता, वाममार्ग आणि बेकायदेशीर वर्तन यापासून दूर राहिले, तरच आपण 'भीमाच्या मताचे' होऊ शकतो.

एकीच्या बळावर आपल्या हक्कांचे रक्षण पुढील काळात करावे लागणार आहे. म्हणूनच वामनदादा काव्याचा शेवट करताना म्हणतात

सद्भाव एकतेचे जर अंतःकरणात असते,
तुटले कुणीच नसते, सारेच एक असते.
वामन, समान सारे, स्वार्थाने अंध नसते;
तुझिया नीतीप्रमाणे सारेच नेक असते.
भीमा, तुझ्या मताचे जर पाच लोक असते,तलवारीचे तयांच्या न्यारेच टोक असते...

स्वार्थी वृत्तीला तिलांजली देऊन समाजहिताला प्राधान्य देणे म्हणजेच 'भीमाच्या मताचे' होणे. वैचारिक मतभेद असले, तरी मनभेद न करता सामाजिक सलोखा राखणे, एकमेकांच्या मतांचा आदर करणे अशी लोकशाही वृत्ती जोपासणे म्हणजेच भिमाच्या मताचे होणे होय.

आजच्या काळातील 'तलवार' म्हणजे आपली लेखणी. तिच्या सामर्थ्यावर आपण अन्याय, दुराचार आणि निगरगट्ट व्यवस्थेला झुकवून समाजहित साध्य करू शकतो. आपण भिमाच्या मताचे आहोत का? असे आत्मचिंतन भीम जयंती उत्सव काळात प्रत्येक व्यक्तीने केले पाहिजे.

**– किशोर जाधव, सोलापूर**
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

# मानवी जगण्याची उमेद देणारी 'आशा' हरपली..!!

त्या परमपित्या परमेश्वराच्या दरबारात जाणारा स्वर्गाचा मार्ग आज कमालीचा गजबजलेला असेल... हाती स्वरफुलांच्या माळा आणि संगीतपुष्पांचे गुच्छ घेऊन स्वर्गातील आजपर्यंतच्या सगळ्याच 'स्वरगंधर्व' आणि स्वरतारकांकडून 'तिच्या' स्वागताच्या तयारीची लगबग सुरू असेल. मन्नादा, हेमंतदा, किशोरदा, रफीसाहेब, मुकेशजी 'अब मेहफील जमेगी' म्हणत आज भलतेच खुशीत असतील. भूलोकापासून परमेश्वराकडे येणाऱ्या मार्गावर ६४ कलांचे स्वर्गलोकातील उपासकही आज आपली कलाकामे बाजूला ठेवून उत्सुकतेने 'तिची' वाट पाहत असतील, या भूतलावरील मर्त्य अशा रसिक कानसेन समुदायांकडून निरोप घेऊन आपल्या मैफलीत येणाऱ्या 'आशा'चे जीवनगाणे इथे आता प्रत्यक्ष ऐकायला मिळेल या अपेक्षेने स्वर्गातली झाडून सगळी स्वरमग्न रसिक मंडळी भलतीच आनंदात असतील, या सर्व स्वरोत्सुकांचं नेतृत्व अर्थातंच आशाची ज्येष्ठ बहीण 'लता' या 'दीदी'कडेच असेल. या भारतातल्या महाराष्ट्राच्या मातीतील मास्टर दीनानाथ मंगेशकर या स्वरांच्या वटवृक्षाच्या सावलीत आशा आणि लता या दोन स्वरवेली फुलल्या आणि बहरल्या, त्यांच्या स्वरसुवासाने अवघ्या देशातच नव्हे तर जगातील संगीताचा आसमंत भरून टाकलेला आहे, हा दोन्ही बहिणींचा स्वर्गीय स्वर आपल्या कित्येक शतके आणि पुढील पिढ्यांनाही स्वरगंधित करणारा आहे. हा अनमोल ठेवा आपल्यासाठी ठेवून लतानंतर आता आशाही पुढच्या प्रवासासाठी निघून गेल्या आहेत.

आकाशवाणी, विविध भारती, रेडीओ सिलोनच्या जमान्यापासून ते आजपर्यंतच्या 'एफएम' यू ट्युबपर्यंतच्या सात आठ दशकांच्या ध्वनीतरंगाचा अवकाश लता आणि आशा या दोन स्वरलहरींनी व्यापलेला आहे... आणि भारतीय संगीताचा आसमंत चंद्र सूर्य असेपर्यंत या दोघींच्या स्वराने भारलेला राहाणार आहे. ही पोकळी कधीही रिकामी होणार नाही, त्यामुळे 'आशा भोसले गेल्याने संगीत विश्वात मोठी पोकळी निर्माण झाली' असं, विधान करण्यात अर्थ नाही, आशा भोसलेंचा स्वर तुलनेने अधिकच हळवा वाटावा, अशी परिस्थिती होतीच की, 'सोनियाच्या ताटी उजळल्या ज्योती, ओवाळीते भाऊराया रे...' या बंधूप्रेमाच्या गाण्यातील आशाच्या स्वराला इतर कुठलाही पर्याय नव्हताच, 'मलमली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे....' शब्द जरी सुरेश भटांचे असले तरी या गाण्यातील लाडीवाळ प्रणयेच्छेला दुसऱ्या कोणत्याही आवाजाने इतका 'मधाळ' न्याय दिला नसताच, लताचा आवाज म्हणजे 'पहाटेच्या दवबिंदूसारखा तरल हळवा'... तर 'आशाचा स्वर म्हणजे मधुगंधाचा गोडवा' आशाच्या आवाजातला धुंद, प्रणयाराधनतेचा कैफ संगीतरसिकाची शुद्ध हरपणाराच होता. आशाचा स्वर कमालीचा अवखळ असल्याने ओ.पी. नय्यर



यांनी आशाच्या स्वरांना न्याय देणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण गाण्यांची संगीतरचना केली. आशाच्या आवाजाची भुरळ ओ.पी. नय्यरसाहेबांपासून ते अलीकडच्या ए.आर. रेहमानपर्यंत अनेक दिग्गज संगीतकारांना पडली होतीच.

आशाच्या आवाजात कुठलाही सांगीतिक अभिनिवेष शोधूनही सापडत नाही, केवळ मानवी, स्त्री-तारुण्यसुलभ जाणिवा, भावनाचा निखळ आवाज म्हणजेच 'आशाचा स्वर' हेच खरं... अशी कित्येक उदाहरणे दाखल्यासाठी शोधावित, केवळ गुलजारांच्या 'इजाजत' मधला आशाचा 'खाली हाथ शाम आयी है...' हा गझलस्वर ऐकला तरी हे मत पटेल. संगीतकार रवीजींनी संगीतबद्ध केलेलं राजेंद्र क्रिश्न यांची शब्दरचना 'जीने का अगर अंदाज़ आये, तो कितनी हँसी है जिन्दगी... मरने के लिए जीना है अगर, तो कुछ भी नहीं है ज़िन्दगी' हे आशा भोसले यांच्या स्वरातील गाणं म्हणजे त्यांच्या संपूर्ण जीवनगाण्याचे कला तत्वज्ञान म्हणावे लागेल. जीवन जगण्याचा 'अंदाज' आशा भोसले यांना संपूर्णपणे आत्मसात झाला होता हेच खरे, आता 'अंदाज' नावाच्या चित्रपटातलं आशाचं 'आशावादी' असंच गाणं 'आठवावं... जिंदगी एक सफर है सुहाना... यहाँ कल क्या हो किसने जाना' किशोरच्या आवाजातलं हे गाणं आपल्याला माहीत असतंच, पण याच चित्रपटात याच गाण्यात आशा भोसलेंनी त्यांच्या आवाजातून जीवनाविषयीचा जो सकारात्मक आशावाद पेरला आहे, तो किशोरपेक्षा कमी उत्कट नाहीच. आशा भोसले यांचे आयुष्य म्हणजे तल्लीन होऊन, समरसून गायलेले एखादे जीवनगाणे किंवा गझल असावी. 'पुढचं पाऊल' चित्रपटातील एकाच या जन्मी जणू फिरूनी नवी जन्मेन मी, अशा आशयासारखं. आशा भोसले यांना आपल्या आवाजाची मर्यादा आणि बलस्थाने स्पष्टपणे ज्ञात होती, म्हणूनच अवखळ, काहीशा बिनधास्त गाण्यांसाठी त्यांचा स्वर संगीतकारांची पहिली पसंती होती. आशा भोसले यांच्या आवाजात जीवनाचा आशावाद पुरेपूर आढळतो. कलेमध्ये विशेष करून संगीतकलेमध्ये सर्वोच्च किंवा सर्वोत्तम स्वरापर्यंत पोहचणे एकवेळ शक्य होईल, परंतु निखळ माणूसपणाच्या स्वरावर सात ते आठ दशके संतुलन राखणे कठीण आहे. आशा भोसलेंच्या स्वरात मीरेसारखी परमेश्वराची निस्सिम भक्ती किंवा समर्पणापेक्षा राधेसारखा अवखळपणा आणि प्रेम, मैत्रीचा हट्ट आहे. म्हणूनच आशा भोसलेंचा स्वर स्त्रीसुलभजाणिवेच्या अतिशय जवळ जाणार आहे.

उत्कटता, प्रणयाराधना, प्रेम, विरह, जिव्हाळा, मैत्री, हट्ट असे कित्येक मानवी पैलू आशा भोसलेंच्या आवाजात आढळतील. आशा भोसले यांनी अगदी सामान्य शब्दरचनांनाही आपल्या स्वरांतून जी मानवी संवेदनेची उंची मिळवून दिली, त्यात शोधूनही भावनिक कृत्रिमता सापडणार नाही. मानवी जगण्याची उमेद देणारी 'आशा' कधीही संपत नसते. आशा देहरुपाने अनंतात विलीन झाली तरी माणसाच्या जगण्यातील 'आशा' तिच्या कित्येक गाण्यांमध्ये काठोकाठ भरलेली आहे. ती आपल्या जीवनात स्वररुपाने कायम राहाणार आहे, ही आशा कधीही संपणारी नाही, ती फिरून जन्म घेईल, अशी आशा बाळगुया. आशा भोसले यांना सुरांची सुमनांजली... आशा भोसलेना भावपुर्ण श्रद्धांजली...!!

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी,**
**कोल्हापूर. ९८६७७३२५०४**

## तो वरचा

मोल कळते कष्टाचे
लागल्या वरती ठेचा
गोळा करे सारे फुले
कधी तरी काटे वेचा

सुडौल हो कलाकृती
असे महत्वाचा ढाचा
आकर्षक इमारतीचा
भक्कम पायथा रचा

यशलाभ मुश्किलीने
मोरपीस टोपा खोचा
जाणीव वाटचालीची
झिजल्या वरती टाचा

ओळखावे समोरच्या
चेहरेअंतर्मनात वाचा
बोलावे तोलून मापून
बसेलं अचंबित वाचा

अल्प फायद्यात तोटा
विचार करावा दूरचा
मृगजळ प्राप्ती साठी
सोडूनये पत्ता हातचा

योग्यवेळी पडोपडदा
दोर कौशल्याने खेचा
अनुभव हा महानगुरु
सोडवालं कठीणपेचा

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# मुलांचा सुट्टीतील वेळ सत्कारणी लावा

आता मुलांच्या शालेय परीक्षा चालू आहेत. आता सुट्ट्या सुरु होतील. खरे तर सुट्टी हा मुलांच्या आयुष्यातला एक आनंदाचा क्षण असतो. कायमचा अभ्यासाचे ओझे असते. त्या ओझ्यापासून काही दिवस दूर.... आता कोणीही अब्भ्यास करा असे म्हणणार नाही. ना शाळेत जावयाची घाई... सारे काई शांत... शांत. पालकही ही मुलांची अवस्था पाहत असतात. पण मुलांची सुट्टी सत्कारणी लावणे अतिशय जरुरी आहे. त्यांना अभ्यासाला लावू नका पण अभ्यासू वातावरण निर्माण करा. त्यांना वाचनाची गोडी लावा. मुलांची मासिके वाचावयास द्या. मुले वाचनात रंगून जातील . त्यांना वर्तमानपत्रे वाचावयास द्या वर्तमानपत्रातील शब्दकोडे सोडवूद्यात या दृष्टीने मराठी तील संध्यानंद हे दैनिक अतिशय चांगले आहे. मुलांना गोष्टीची पुस्तके वाचावयास द्या एखादे वाचनालय त्यांच्यासाठी सुरु करा. ती राम लक्षणांच्या कथेत रंगून जातील त्यांना दररोज दैनंदिन लिहावयास शिकवा. वेळ कसा खर्च होतो व दिवसाच्या घडामोडी दैनंदिनीत उमटुदेत . त्यांना लिहावयाची सवयी लागेल व आपण दररोज काय करतो याचा स्वानुभव मिळेल. हल्ली बऱ्याच शहरात उन्हाळी सुट्टीचे वर्ग असतात. तेथे व्यायाम व इतर गोष्टी शिकवितात. शिस्त लावतात. सांघिक खेळ खेळावयास मिळतात. ज्यांना शक्य असेल त्यांना तेथे पाठवा. इतिहासातील अनेक गोष्टी त्यांनी ऐकलेल्या असतात. आता प्रत्यक्षात त्या अनुभवण्याची संधी द्या. त्यांच्या बरोबर प्रतापगड, सिंहगड, शिवनेरी किल्ले दाखवा. पुणे दर्शन मधून किंवा इत्तर शहरातून अशा दर्शन गाड्यांची सोय असते. नसेल तर स्वतःच्या वाहनातून त्यांना घेऊन जा. तेथील वातावरण त्यांना निश्चितच आवडेल. इतिहासातील प्रत्यक्ष क्षण अनुभवण्याची संधी त्यांना मिळेल ज्या मुलांचे हस्ताक्षर सुधारावयाचे आहे त्यांना दररोज हस्ताक्षराचे धडे द्या. एखाद्या हस्ताक्षराच्या वर्गाला सुद्धा त्य्यांना घालावयास हरकत नाही त्यातून त्यांचे हस्ताक्षर सुधारेल.

त्यांना प्राणायाम व योगासने शिकवा व व्यायामाची गोडी लावा . एकूणच आरोग्य, वाचन, हस्ताक्षर ,.ऐतिहासिक स्थळे पाहणे यात मुलांचा वेळ कसा जातो हे समजणार नाही. आम्ही लहान असताना आजोबा आम्हास त्यावेळी दररोजचा केसरी वाचावयास लावत तसेच वाचनासाठी प्रसाद मासिकाचे अनेक अंक देत. त्यातून आम्हास वाचवायची गोडी निर्माण झाली. जीवनात शिकण्यासारखे व आनंद घेण्यासारखे खूपच आहे. त्याचा आस्वाद घ्यावयास मुलांना शिकवा.. मग घालविणार ना मुलांची सुट्टी आनंदात ?

**– शांताराम वाघ, पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानकडून प्रशांत माळवदे यांचा सन्मान



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१५, पंढरपूर :** पंढरपूर येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान यांच्यावतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती महोत्सवानिमित्त डिजिटल मीडियातील उल्लेखनीय कार्याबद्दल पत्रकार प्रशांत माळवदे यांचा श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती सदस्य हभप ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांच्या हस्ते शाल, फेटा, हार, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डी राज सर्वगोड समितीचे अध्यक्ष श्रीकांत चंदनशिवे सचिव ज्ञानेश्वर कांबळे, डिजिटल मीडिया पत्रकार संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष प्रवीण नागणे, शेतकरी संघटनेचे नेते प्रभाकर भैय्या देशमुख, माजी नगराध्यक्ष उज्वला भालेराव, प्रा.अनिल ननवरे, सल्लागार नितीन काळे, प्रा.सुदाम गायकवाड, प्रा. राजुभाई मुलानी, अपराजित सर्वगोड, रामदास नागटिळक,विशाल आर्वे आदि मान्यवर उपस्थित होते.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती सदस्य संभाजी शिंदे, अन्न आयोग अध्यक्ष महेश ढवळे, एलआयसी विकास अधिकारी बी एस चौगुले, जिल्हा परिषद सदस्य सुप्रिया गायकवाड, पंचायत समिती सदस्य विजय शिंदे, अक्काताई लोखंडे, सरपंच रणजीत जाधव, न्यू इंग्लिश स्कूलचे प्राचार्य के डी शिंदे, वसंतराव काळे हायस्कूलचे मुख्याध्यापक संजय काळे, संस्कार इंग्लिश मीडियम स्कूलचे अध्यक्ष सीताराम माने व समस्त ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

# राज्य सरकार मुंबईत सर्वात मोठी टाउनशिप उभारणार

## सर्व सामान्यांचे घराचे स्वप्न प्रत्यक्षात उतरणार...



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१५, मुंबई :** मुंबई शहर हे देशाची आर्थिक राजधानी आहे. लाखो लोक नोकरी तसेच व्यवसायाच्या निमित्ताने मुंबईत राहतात. मुंबईत आपलं हक्काचे घर असावे असं अनेकांचे स्वप्न असतं. मात्र, मुंबईत घरांच्या किंमती अवाक्याबाहेर गेल्या आहेत.

यामुळे मुंबईत घर खरेदी करणे शक्य होत नाही. आता सर्वसामान्यांचे मुंबईत घर खरेदी स्वप्न पूर्ण होणार आहे. महाराष्ट्र सरकार मुंबईत सर्वात मोठी टाऊनशीप निर्माण करत आहे. महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून ७,२९,००,००,००० रुपयांचा गृहनिर्माण प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सर्वसामान्यांना स्वस्त दरात घरं खरेदी करता येणार आहे.

मुंबईत स्वतःचे घर असावे असे मध्यमवर्गीय कुटुंबांचे हे स्वप्न लवकरच पूर्ण होणार आहे. मुंबईचे पश्चिम उपनगर असलेल्या बोरिवली (पश्चिम) येथे कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी एका भव्य टाऊनशिप उभारण्याच्या प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला आहे. महाराष्ट्र सरकारने प्रधानमंत्री आवास योजना–शहरी अंतर्गत या महाप्रकल्पाला हिरवा कंदील दाखवला आहे. महाराष्ट्रातील कोणत्याही महानगरातील हा अशा प्रकारचा पहिलाच प्रकल्प ठरणार आहे.

बोरिवलीच्या शिंपोली आणि गोराई भागांमध्ये पसरलेल्या एकूण २८.८४ एकर जमिनीवर ही टाऊनशिप उभारली जाणार आहे. गोराई येथील भूखंड बीएसएनएलच्या मालकीचा असून, शिंपोली येथील भूखंड एमटीएनएलच्या मालकीचा आहे. या दोन भूखंडावर ही भव्य टाऊनशिप उभारण्याचा प्रक्लप तयार करण्यात आला आहे.

अंदाजे ७२९ कोटी रुपये खर्चाने या जमिनी महाराष्ट्र गृहनिर्माण विभागाकडे हस्तांतरित करण्याच्या प्रस्ताव आहे. या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली आहे.

सर्वसामान्यां घर खरेदी करता यावे यासाठी हा प्रकल्प उभारला जात आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटक आणि कमी उत्पन्न गट अशा दोन श्रेणीत या प्रकल्पाअंतर्गत घरे उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. या टाउनशिपमध्ये साधारणपणे ४५० चौरस फूटांची घरे बांधली जाणार आहेत. परवडणाऱ्या दरात ही घर उपलब्ध करून दिली जातील.

याचा विकास केवळ एक गृहनिर्माण प्रकल्प म्हणून नव्हे, तर एक संपूर्ण टाउनशिप म्हणून केला जाणार आहे. या संकुलात एक शाळा आणि रुग्णालय यांचा समावेश असेल. एक मनोरंजनात्मक खेळाचे मैदान आणि सांस्कृतिक केंद्रदेखील उपलब्ध असेल. टाउनशिपमध्ये एक कौशल्य विकास केंद्र स्थापन केले जाईल, जे तरुणांना रोजगारासाठी आवश्यक प्रशिक्षण देईल. दैनंदिन गरजांसाठी एक व्यावसायिक क्षेत्रही असेल.

या टाउनशिपची सर्वात बेस्ट पार्ट म्हणजे याला मिळणारी कनेक्टिव्हिटी. येथे वाहतुकीचे अनेक पर्याय मिळणार आहेत. या परिसराजवळ दोन मेट्रो स्टेशन आहेत. तसेच, प्रस्तावित वर्सोवा–दहिसर कोस्टल रोडला थेट जोडणी मिळणार आहे. यामुळे दक्षिण मुंबई आणि अंधेरीला पोहोचणे अधिक सोपे आणि जलद होणार आहे.

दरम्यान महा–हाऊसिंगचे व्यवस्थापकीय संचालक त्रिंबक कासार यांनी या प्रकल्पाची माहिती दिली. मुख्यमंत्र्यांनी जमीन हस्तांतरण प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा पुढील दोन ते तीन महिन्यांत पार पडण्याची शक्यता आहे. पुढील तीन ते चार वर्षांत हा हा महाप्रकल्प पूर्ण करण्याचे टार्गेट आहे. लवकरच या प्रकल्पाची संपूर्ण रुपरेषा जाहीर केली जाणार आहे.

## आडगाव बाजार येथे मोठ्या उत्साहात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१४, जिंतूर :** तालुक्यातील आडगाव बाजार येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे गावातील मुख्य मार्गावरून मिरवणूक काढण्यात आली. ट्रॅक्टरवर प्रतिमेला मांडून आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात अली होती. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो, संविधानाचा विजय असो या घोषणांनी परिसर दणदणून गेला. या घोषणा महिला पुरुष मंडळी देत होते. मिरवणुकी समई गावकऱ्यांच्या वतीने गावातील चौका चौकात पुष्पहार घालून अभिवादन करत होते.

कडकडत्या उन्हात गावातील प्रौढ महिला पुरुष मुलांची संख्या लक्षणीय होती.यावेळी जयंती अध्यक्ष प्रवीण लक्ष्मण ठोके, उपाध्यक्ष प्रशांत भागोराव ठोके सचिव सतीश संतोष ठोके, देवीदास ठोके, दिलीप ठोके, दिनकर ठोके, कपिल ठोके, विशाल ठोके, बाळू ठोके, विलास ठोके, संजय ठोके, पंजाब ठोके, बाबासाहेब ठोके, मिलिंद ठोके, रवी ठोके, दिपक ठोके, प्रवीण ठोके, अशोक ठोके, लक्ष्मण ठोके, बालू ठोके, सचिन इंगोले यांनी जयंती साजरी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# खारघर हिल महापौर मॅरेथॉन १८ एप्रिलला




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१५, पनवेल :** महानगरपालिकेच्या वतीने येत्या शनिवार, १८ एप्रिल २०२६ रोजी सेंट्रल पार्क, खारघर येथे भव्य 'खारघर हिल महापौर मॅरेथॉन' (प्रोमो रन) चे आयोजन करण्यात आले आहे. निसर्गरम्य खारघर हिलच्या सानिध्यात होणाऱ्या या स्पर्धेत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्यासाठी नोंदणी करावी असे आवाहन महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

**'खारघर हिल महापौर मॅरेथॉन' (प्रोमो रन) चे वैशिष्ट्य**

खारघर हिलच्या निसर्गरम्य वातावरणामुळे ही मॅरेथॉन धावपटूंसाठी एक वेगळा अनुभव देणारी ठरणार आहे. या प्रोमो रनच्या माध्यमातून फिटनेस प्रेमींना एकत्र आणण्याचा प्रशासनाचा मानस आहे. नागरिकांमध्ये आरोग्याप्रति जागरूकता निर्माण व्हावी आणि शहरात क्रीडा संस्कृती वाढावी, या उद्देशाने ही मॅरेथॉन आयोजित केली जात आहे.

खारघर हिल महापौर मॅरेथॉन (प्रोमो रन) १० किमी व ०५ किमी अशा दोन गटांमध्ये होणार आहे. १० किमी मॅरेथान सकाळी ५.४५ तर ५ किमी मॅरेथॉन सकाळी ७.०० सुरू होणार आहे. पनवेल आणि नवी मुंबई परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी, व्यावसायिक धावपटूंनी आणि क्रीडाप्रेमींनी या 'प्रोमो रन'मध्ये सहभाग घेण्याचेआवाहन पनवेल महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

मॅरेथॉनची तारीख अवघ्या तीन दिवसांवर येऊन ठेपली असून, नोंदणी प्रक्रियेला नागरिकांनी उदंड प्रतिसाद द्यावा असे आवाहन पालिकेने केले आहे. ज्या नागरिकांना या मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हायचे आहे त्यांनी आपली नोंदणी https://forms.gle/Sk5YLFit2cvL9QD99 या लिंकवरती त्वरित आपली नोंदणी निश्चित करून या भव्य क्रीडा सोहळ्याचा भाग व्हावे.

स्पर्धेची अधिक माहिती
दिनांक: शनिवार, १८ एप्रिल २०२६
स्थळ: सेंट्रल पार्क, खारघर
प्रमुख आयोजक: पनवेल महानगरपालिका

**मॅरेथॉनचा मार्ग**

**५ कि.मी. मॅरेथॉनसाठी मार्ग**

सेंट्रल पार्क फइस्कॉन मंदिर फग्रामविकास भवन फमुंब्रा मेट्रो स्टेशन फमुंब्रा जंक्शन यू टर्न फलोकनेते रामशेठ ठाकूर शाळा, सेक्टर १९ फ ग्रामविकास भवन फसेंट्रल पार्क

**१० कि.मी. मॅरेथॉनसाठी मार्ग**

सेंट्रल पार्क फइस्कॉन मंदिर फग्रामविकास भवन फमुंब्रा मेट्रो स्टेशन फमुंब्रा जंक्शन यू टर्न फलोकनेते रामशेठ ठाकूर शाळा, सेक्टर १९ फ ग्रामविकास भवन फउत्सव चौक फबेलापाडा मेट्रो स्टेशन यू टर्न फउत्सव चौक फगोल्फ कोर्स फसेंट्रल पार्क

# आ.डॉ.देशमुख यांचा संकल्प ; क दर्जा प्राप्त नवीन बिना बौद्ध विहाराचा सर्वांगीण विकास करू



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** भानेगाव येथील नवीन बिना बौद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभा अंतर्गत क वर्ग तिर्थ क्षेत्राचा दर्जा प्राप्त नवीन बिना बौद्ध विहरात विश्वरत्न भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीच्या मिरवणुकीची सुरवात डॉ. आशिष देशमुख, आमदार, सावनेर–कलमेश्वर विधानसभा क्षेत्र यांच्याहस्ते निळा झेंडा दाखवून करण्यात आली. सकाळी वनदेव लांजेवार व सुरेश गजभिये यांच्या नेतृत्वात जय भीम रेली काढण्यात आली. सतीश मेश्राम (पोलिस) व दीप्ती मेशाम यांच्याहस्ते ध्वजारोहण (निळा झेंडा) करण्यात आले.

सायंकाळी मिरवणुकीच्या उद्घाटनीय कार्यकमात तथागत गौतम बुद्ध यांच्या छायाचित्राला तर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाईच्या पूर्ण पुतळ्यांना डॉ. आशिषराव रणजीतबाबू देशमुख, यांच्याहस्ते माल्यार्पण व बुद्ध वंदना घेवून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. भारतीय बौद्ध महासभा नवीन बिना अध्यक्ष डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांनी क वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा प्राप्त नवीन बिना बौद्ध विहाराच्या विकास कार्यात येणार्या अडचनींची तसेच भानेगाव टी पॉइंटला विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याच्या भारतीय बौद्ध महासभेच्या मागणीची माहिती आमदार साहेबांना दिली.

यावर मिरवणुकीत शमिल विशाल जनसमुदायाला संबोधित करतांना आमदार डॉ. आशिषराव रणजीतबाबू देशमुख, यांनी क दर्जा प्राप्त नवीन बिना बौद्ध विहाराचा सर्वांगीण विकास करण्याची कटिबद्धता जाहीर करतांना भानेगाव टी पॉइंटला डॉ. बाबासाहेब यांचे नाव देण्यासाठी ग्रंपंचायतला प्रक्रिया करण्याचे निर्देश दिले आणि प्रशाकिय व तांत्रिक अडचणी दूर करून नाव देण्याचा प्रयत्न करू अशी माहिती देतांना सर्वांना संवैधानिक मार्गावर चालण्याचे आव्हान करीत डॉ. बाबासाहेब आदरांजली वाहिली.

याप्रसंगी भाजपाचे राजीव पोतदार, रमेश जैन, श्यामराव सरोदे, चन्द्रशेखर लांडे, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रविंद्र चिखले, खापरखेडा पोलिस ठाण्याचे पोलिस निरक्षक हरिष रूमकर (सेवेत कार्यरत), भानेगावचे उपसरपंच सोनू बोरकर, सदस्य पुष्पा जालंधर, दर्शना बोरकर, सोनाली बागडे, भूषण गौरकर, कमलेश भास्कर, धिरज नागरकर, विजय गौरकर, अनेश चवरे, अमोल कळंबे, सचिन नागरकर, योगेश जालंधर , मुकेश नायडू, जितेश देशभ्रतार, भा. बौ. महासभेचे उपाध्यक्ष अनिल लांजेवार, सचिव मुकेश बागडे, कोषाध्यक्ष रविंद्र ढोके, दत्तगुरू तागडे, आनंद वसनिक, पृथ्वीराज गोलाईत, बंडू डोंगरे सहित मिरवणुकीच्या उद्घाटन प्रसंगी व मिरवणुकीत विशाल जनसमुदाय शमिल झाला होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी आयोजक भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघच्या कार्यकारिणीने परिश्रम घेतले.

## सानपाड्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकाचा भव्य उद्घाटन सोहळा संपन्न



**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.१५, सानपाडा (नवी मुंबई) :** सेक्टर ५ येथे नव्याने उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाचे उद्घाटन भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते.

मानखुर्द–बेलापूर रेल्वे प्रकल्पग्रस्त, दत्तगुरुनगर, सानपाडा येथील नागरिकांच्या पुढाकारातून हा स्तुत्य उपक्रम साकारण्यात आला. मुख्य प्रवर्तक मकरंद गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अध्यक्ष राजू शिंदे यांच्या नेतृत्वात चौकाचे सुंदर आणि आकर्षक स्वरूपात उभारणी करण्यात आली.

या चौकाचे उद्घाटन सभापती तथा नगरसेविका शैला जगदीश पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. त्यामध्ये माजी नगरसेविका सुनंदा पाटील, नगरसेविका शिल्पा ठाकूर, नगरसेवक सुनील कुरकुटे, गणपत भाऊ भापकर, परिवहन समिती सदस्य यशपालजी ओहोळ, तसेच महादेव अर्जुन, चंद्रकांत जाधव, विजय कांबळे, प्रविण उबाळे, मधुकर कांबळे, जगदीश पाटील, राजेश ठाकूर, श्रीराम मढवी, अजित सोनवणे यांचा समावेश होता.

महिला सहकार्यामध्ये मोहोरबाई डावरे, नागर बनसोडे, नेहा कसबे, आरती शिंदे, रेश्मा गवळी, भारती शिरसाठ, उषा शिरसाठ, आश्विनी सुरळकर यांनी मोलाचे योगदान दिले.

कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांसह अंकुश गवळी (अध्यक्ष R.P.I. आठवले गट), भास्कर वाघमारे, मनोज औचरमल, केशव डावरे, गणेश औचरमल, तसेच विनोद धुरंधर (अध्यक्ष, बेलापूर विधानसभा बसपा) यांचे विशेष सहकार्य लाभले.

या सोहळ्यास स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, चौकाच्या माध्यमातून परिसरात सामाजिक एकात्मता आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# महिलांच्या सुरक्षेसाठी 'वन स्टॉप सेंटर' ठरतेय मोठा आधार

## केंद्राच्या माध्यमातून १ हजार ४११ महिलांना मिळाली मदत

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१५, अहिल्यानगर :** महिलांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक छळ तसेच संकटग्रस्त म हिलांना तात्काळ मदत मिळावी या उद्देशाने शासकीय रुग्णालयाच्या परिसरात सुरू करण्यात आलेले 'वन स्टॉप सेंटर' प्रभावीपणे कार्यरत आहे. अनेक पीडित महिलांसाठी हे केंद्र खऱ्या अर्थाने आधारवड ठरत आहे.

जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या या केंद्राने गेल्या काही वर्षांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील सुमारे १,४११ महिलांना या सेंटरच्या माध्यमातून विविध प्रकारचे संरक्षण आणि साहाय्य देण्यात आले असल्याची माहिती केंद्राच्या प्रशासक श्रीमती शबाना शेख यांनी दिली.

महिला व बाल विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या या केंद्रामार्फत पीडित महिलांना एकाच छताखाली सर्व आवश्यक सेवा उपलब्ध करून



दिल्या जात आहेत. यामध्ये प्रामुख्याने वैद्यकीय म दत, पोलीस साहाय्य, कायदेशीर सल्ला, तज्ज्ञांकडून समुपदेशन, तसेच तात्पुरती निवास व्यवस्था यांचा समावेश आहे.

कौटुंबिक वाद, छळ व मानसिक ताण यांसारख्या समस्यांवर उपाय म्हणून तज्ज्ञ समुपदेशकांकडून योग्य मार्गदर्शन दिले जात असल्याने अनेक महिलांना आत्म विश्वासाने जगण्यासाठी नवी उभारी मिळत आहे.

यासोबतच महिलांना त्यांच्या हक्कांबाबत जागरूक करण्यासाठी प्रशासन विविध उपक्रम राबवत आहे. शाळा, महाविद्यालये व ग्रामीण भागांत विशेष मोहिमा आयोजित करून महिलांना कायदेशीर हक्क, हेल्पलाइन क्रमांक आणि उपलब्ध शासकीय सेवांची माहिती दिली जाते.

संकटात सापडलेल्या महिलांसाठी हे केंद्र अहोरात्र (२४ तास) कार्यरत असून, तातडीच्या परिस्थितीत महिलांनी १८१ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

या केंद्रामार्फत महिलांना तात्काळ वैद्यकीय मदत आणि पोलीस साहाय्य उपलब्ध करून दिले जाते. तसेच, मोफत कायदेशीर सल्ला देऊन तक्रार नोंदणीस मदत केली जाते. मानसिक ताणातून बाहेर पडण्यासाठी मानसोपचार व तज्ज्ञांकडून समुपदेशनाची सुविधा दिली जाते. याशिवाय, गरज भासल्यास महिलांसाठी तात्पुरती सुरक्षित निवास व्यवस्था देखील उपलब्ध करून दिली जाते.महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि सुरक्षिततेसाठी शासनाने सुरू केलेल्या या उपक्रमाला जिल्ह्यातून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

# माथेरानमध्ये वारकरी दिंडी सोहळा उत्साहात संपन्न

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१५, माथेरान :** माथेरान येथे वारकरी संप्रदायाच्या पायी दिंडी सोहळ्याचे पाचवे वर्ष अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात पार पडले. वारकरी सांप्रदाय मंडळ, नेरळ व परिसर यांच्या वतीने आयोजित या दिंडीमुळे माथेरान परिसर नामस्मरण, अभंग आणि हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला.

नेरळ येथून प्रारंभ झालेली ही पायी दिंडी माथेरानमध्ये दाखल होताच इंदिरानगर येथील गणेश मंदिरात विक्रांत युवक मंडळाचे अध्यक्ष आदेश घाग, मयुरी निचिंदे, नगरसेविका लता ढेबे, अनुसया ढेबे तसेच महिला व पुरुष भाविकांनी वारकऱ्यांचे जल्लोषात स्वागत केले. टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषाने वातावरण भक्तिमय झाले होते.यानंतर वारकऱ्यांनी गणेश मंदिरात गजर आरती



सादर करून राम मंदिराकडे प्रस्थान केले. राम मंदिर येथे रिंगण सोहळा, फ ुगडी आणि विविध पारंपरिक वारकरी उपक्रम सादर करण्यात आले. या कार्यक्रमांमुळे उपस्थित भाविकांमध्ये भक्तीभाव अधिक वृद्धिंगत झाला. त्यानंतर दिंडीने माथेरानचे ग्रामदैवत श्री पिसरनाथ मंदिराकडे प्रस्थान केले. येथे सर्व वारकऱ्यांनी दर्शन घेतले. मंदिर परिसरात कीर्तन व प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. ह.भ.प. रामदास महाराज सांकुळे, ह.भ.प. बुवा देव, ह.भ.प. नरेश महाराज पाटील, ह.भ.प. नागेश गवळी तसेच ह.भ.प. काशिनाथ महाराज कदम यांच्या उपस्थितीत संपूर्ण परिसर आध्यात्मिकतेने भारावून गेला.

दरवर्षी नियमितपणे आयोजित होणाऱ्या या दिंडीचे प्रमुख रामचंद्र ढेबे, तुकाराम आखाडे आणि जगन्नाथ ढेबे यांच्या प्रयत्नांमुळे हा सोहळा यशस्वीरीत्या पार पडला. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे माथेरान परिसरात वारकरी संप्रदायाची परंपरा अधिक दृढ होत असून, स्थानिक नागरिकांमध्ये भक्तीची भावना वाढीस लागत आहे.

या दिंडीमुळे माथेरानमध्ये वारकरी संप्रदायाचे महत्त्व अधोरेखित होते. गणरायाच्या पवित्र चरणी नतमस्तक होत, पालखी सोहळ्याचे गणेश मंदिरात झालेले आगमन हा अत्यंत आनंददायी व पवित्र क्षण ठरला. गजर, कीर्तन आणि अमृततुल्य मार्गदर्शनातून सर्वांच्या अंतःकरणात भक्तीची ज्योत प्रज्वलित झाली. संतवाणीतील विचार आणि मार्गदर्शन हीच खरी आध्यात्मि क संपत्ती असल्याची भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.

# जलसंवर्धनासाठी लोकसहभाग अत्यावश्यक : आ. जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** पाणी हे जीवनाचे मूळ आहे. भविष्यातील पिढ्यांसाठी पाण्याचा साठा सुरक्षित ठेवायचा असेल, तर आजपासूनच त्याचे जतन, संवर्धन आणि योग्य नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे. जलसंवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने त्यात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृती पंधरवाडा २०२६ निमित्त चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळ तसेच पाटबंधारे विभाग, चंद्रपूर यांच्या वतीने आज बुधवारी दिशा विश्रामगृह येथे आयोजित जलजागृती सप्ताह कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला अधीक्षक अभियंता प्रा. जोड, कार्यकारी अभियंता प्रसाद पठारे, अधीक्षक अभियंता अमोल वसूलकर, जलेश सिंह तसेच नामदेव राहुडे यांची उपस्थिती होती.

यावेळी ते पुढे म्हणाले की, पाण्याचा अपव्यय थांबवणे, पावसाचे पाणी साठवणे, जलस्रोतांचे संरक्षण करणे आणि पाण्याची स्वच्छता राखणे ही काळाची गरज आहे. समाजातील प्रत्येक घटकाने 'पाणी वाचवा, जीवन वाचवा' हा मंत्र अंगीकारला, तरच भविष्यातील जलसंकट टाळता येईल, असे ते म्हणाले.



लोकसहभागातून जलसंवर्धनाबाबत जनजागृती करणे आणि पाण्याचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रम ाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमादरम्यान सर्व उपस्थितांनी एकत्र येत जलप्रतिज्ञा घेत पाणी बचत, पाण्याचा अपव्यय टाळणे तसेच जलस्रोतांचे संरक्षण व संवर्धन करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# जनुना येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, बुलडाणा :** बुलढाणा तालुक्याम धील सीमेवर असणारे व डोंगर भागात असणारे गाव म्हणून ज्याची ओळख आहे व स्वर्गीय ढोमणे मामा यांच्या नावाने ओळख असणारे जनुना या गावांमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मागील दोन-तीन वर्षांमध्ये जे विद्यार्थी शासकीय सेवेत रुजू झाली आहे. अशा गावातील विद्यार्थ्यांचा व त्यांच्या आई-वडिलांचा सत्कार सोहळा ग्रामपंचायत जनुना द्वारा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी डॉ.अमिता पवार यांनी भूषवले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीमध्ये धाड पोलीस ठाणेदार श्री.भोस, प्रमोद ढोमणे पोलीस पाटील, सचिन जाधव ग्रामपंचायत अधिकारी योगेश मुळे कोषाध्यक्ष ग्रामपंचायत अधिकारी सोसायटी योगेश सुरडकर तालुका समन्वयक व गावचे मा सरपंच तथा प्रशासक



अनिता प्रमोद ढोमणे गावची माजी सरपंच प्रवीण पाटील टायगर बारवाल मा. उपसरपंच. तंटामुक्ती माजी अध्यक्ष भगवान नरोटे. अंबादास सपकाळ. राजपूत सर पाटील, जि .प. मुख्याध्यापक.देवकर सर.पवार सर.. ग्रामसेवक लहासे साहेब उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोची पूजन करून झाली. गावातील. जे ३१ विद्यार्थी शासकीय सेवेत रुजू झाली आहे अशा विद्यार्थ्यांची व पालकांचे स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. तसेच जिल्हा परिषद शाळेमध्ये च्या विद्यार्थ्यांनी यावर्षी नवोदय परीक्षा व एन एम एस परीक्षा मध्ये यश संपादन केला आहे. अशा विद्यार्थ्यांचा तसेच जिल्हा परिषद शाळा येथील शिक्षकांचा सत्कार सोहळा घेण्यात आला. कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित असणाऱ्या मान्यवरांनी आपल्या मनोगत आतून विद्यार्थी व पालकांचे स्वागत केले. ढोमणे सर यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले कार्यक्रमाला अध्यक्ष लाभलेल्या पवार मॅडम यांनी विद्यार्थ्यांनी जे यश प्राप्त केले आहे तसेच त्यांच्या मेहनतीचे व पालकांनी दिलेल्या सहकार्याचे अभिनंदन केले व जि.प. शाळेतील सर्व शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे सुद्धा अभिनंदन केले.

गावाने जो उपक्रम आयोजित केला आहे. असे उपक्रम प्रत्येक गावामध्ये घेण्यात यावे जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये एक जिद्द व भविष्यासाठी आपल्याला काय करायचं आहे या यासाठी त्याचा फायदा होईल हे सांगितले कार्यक्रमाचे संचालन चव्हाण सर. प्रास्ताविक.लहासे साहेब. यांनी केले कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन ग्रामपंचायत जनुना.व नितीन ढोमणे सर यांच्या संकल्पनेतून झाले. आभार प्रदर्शन श्री देवकर यांनी केले कार्यक्रमाला गावातील मंडळी तसेच विद्यार्थी मंडळी प्रामुख्याने उपस्थित होते.

# थोडक्यात

## स्वामी समर्थ मंदिरात रक्तदान शिबिराचे आयोजन; भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१४, पालम (परभणी) :** पालम येथील येथील श्री स्वामी समर्थ महाराज मंदिराच्या वतीने दि.१४ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला भाविक आणि स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत ५२ रक्तदान रक्तदान केले. समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडण्याच्या उद्देशाने आणि रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन श्री स्वामी समर्थ सेवा समिती च्या वतीने या मानवतावादी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दुपारी १२ वाजता स्वामींच्या प्रतिमेचे पूजन आणि आरती करून शिबिराची सुरुवात करण्यात आली. स्वामींची सेवा ही केवळ पूजेपुरती मर्यादित न ठेवता ती जनसेवेच्या माध्यमातून घडावी, या विचाराने दरवर्षी असे उपक्रम राबविण्यात जातो. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गजानन गडम, झटींग पाटील, दीपक चोरमारे, गणेश कल्याणकर, विठ्ठल पांचाळ, संजय गडम, राजकुमार बचाटे, सुरेशराव चव्हाण, आदींनी परिश्रम घेतले.

## माथेरान घाटात पुन्हा बिबट्याचे दर्शन, नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.१५, माथेरान :** नेरळ-माथेरान घाट मार्गावर काल रात्री साडेआठच्या सुमारास चांगभले मंदिराजवळील दुसऱ्या वळणावर बिबट्या रस्त्याच्या कडेला बसलेला दिसला. घाटातून जाणाऱ्या अनेक दुचाकीस्वारांना त्याचे दर्शन झाले असून टॅक्सी चालक महेश जाबरे यांनाही बिबट्या दिसल्याची माहिती आहे. यापूर्वीही काही दिवसांपूर्वी माथेरानमधील सन अँड सेड हॉटेल समोर मुख्य रस्त्यावर पहाटे बिबट्याचे दर्शन झाले होते.

वन विभागाच्या माहितीनुसार परिसरात एक ते दोन बिबटे असल्याची शक्यता असून उन्हाळ्यात पाण्याचे स्रोत आटल्याने आणि खाद्य कमी झाल्याने वन्यजीव नागरी वस्तीच्या दिशेने येत आहेत. त्यामुळे जंगलात ठिकठिकाणी पाणवठे तयार करण्याची गरज. आहे असे नितीन सावंत यांनी सांगितले.नागरिकांनी रात्रीच्या वेळी विशेष काळजी घ्यावी, निर्जन भाग टाळावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच जंगल संवर्धन, पाण्याची उपलब्धता आणि नैसर्गिक अधिवास टिकवणे आवश्यक असून, त्यामुळे वन्यजीवांचा वावर जंगलातच राहून मानव-वन्यजीव संघर्ष कमी होण्यास मदत होणार आहे.

## चंद्रपुरात पहिल्यांदाच, डॉ.आंबेडकर जयंतीत रक्तरंजित घटना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** शांतता, समता आणि बंधुत्वाचा संदेश देणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाला चंद्रपूर शहरात यंदा पहिल्यांदाच हिंसाचाराचे गालबोट लागले आहे. आंबेडकर जयंती निमित्त काढण्यात आलेल्या रॅलीदरम्यान डीजे वर नाचताना झालेल्या किरकोळ धक्काबुक्कीचे रूपांतर भीषण हल्ल्यात होऊन एका तरुणाचा मृत्यू झाला, तर दुसरा जखमी झाल्याची धक्कादायक घटना शहरातील आंबेडकर पुतळा परिसरात घडली. मृत व्यक्तीचे नाव रविकांत टेंभूरकर (वय ३३), रा. इंदिरा नगर) असे असून तो इंदिरा नगर परिसरातील रहिवासी आहे. या घटनेत अनिकेत गलबले हा तरुण जखमी झाला असून त्याच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, इंदिरा नगर येथील भीमरत्न बहुद्देशीय युवा संस्था यांच्या वतीने गांधी चौकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त भव्य रॅली काढण्यात आली होती. रॅली शहरातील प्रमुख मार्गाने जात असताना डीजे च्या तालावर युवक मोठ्या उत्साहात नाचत होते. याचदरम्यान काही युवकांमध्ये धक्काबुक्की झाली आणि त्यातून वाद निर्माण झाला. सुरुवातीला किरकोळ असलेला हा वाद काही वेळातच उग्र बनला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आणि वाद मिटवण्यासाठी पुढे गेलेल्या रविकांत टेम्बुरकर यांच्यावर काही युवकांनी अचानक धारदार शस्त्राने हल्ला केला. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या हल्ल्यात अनिकेत गलबले हाही जखमी झाला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी जलद कारवाई करत सहा आरोपींना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये रेहांत पठाण (१९), शेख जिशान (२२), चेतन सोनवणे (३१), बादल भैसारे (१९), यासील शेख (३२) यांचा समावेश आहे. तसेच एका अल्पवयीन मुलालाही ताब्यात घेण्यात आले आहे. दरवर्षी मोठ्या उत्साहात आणि शांततेत साजरी होणारी आंबेडकर जयंती यंदा मात्र हिंसाचाराने गाजल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. ही चंद्रपूर शहराच्या इतिहासातील पहिलीच अशी घटना असून, यामुळे सामाजिक ऐक्यावर आघात झाला आहे, अशी भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत असून, घटनेमागील नेमके कारण आणि इतर संबंधितांचा शोध घेतला जात आहे.

## पेंडू खुर्द येथे विवाहितेची आत्महत्या; पतीसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील पेंडू खुर्द येथील विवाहित महिलेच्या आत्महत्येप्रकरणी पतीसह सासरच्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.सोनाली निवृत्ती चमकुरे (वय २७) असे मृत महिलेचे नाव असून १४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे ११:३० वाजण्याच्या सुमारास तिने आपल्या राहत्या घरी आत्महत्या केल्याची घटना घडली. या प्रकरणी शंकर गोविंद रायपुरे रा. पोत्रा ता. कळमनुरी, जि. हिंगोली, सध्या वास्तव्य वसमत यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती निवृत्ती बापुराव चमकुरे याच्यासह ध्रुपतबाई बापुराव चमकुरे, बापुराव चमकुरे व भिमराव बापुराव चमकुरे सर्व रा. पेंडू खुर्द, ता. पालम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार संबंधित महिलेला मूलबाळ होत नसल्याच्या कारणावरून तसेच ट्रॅक्टर व विहिरीच्या कामासाठी माहेरहून पैसे आणावेत, या कारणावरून आरोपींकडून वारंवार मानसिक, शारीरिक व आर्थिक छळ केला जात होता या सततच्या छळाला कंटाळून तिने आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस निरीक्षक शेषराव खटाने यांच्या आदेशानुसार पोलीस उपनिरीक्षक शिवकांत नागरगोजे यांनी भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम १०८, ३ (५) नुसार गुन्हा दाखल केला असून पोलिस निरीक्षक एस के खटाने यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रकाश लोखंडे हे करत आहेत. आरोपी अद्याप अटकेत नसून त्यांचा शोध सुरू आहे.